सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात गुटखा बंदी फक्त कागदोपत्री

### माफियांना पोलीसांचा आशीर्वाद?




**दीपक शेळके**

**जालना -** राज्य शासनाने गुटख्यावर संपूर्ण बंदी लागू केली असली तरी प्रत्यक्षात गुटख्याची विक्री सर्रास सुरु आहे. गुटखा माफियांच्या जाळ्यातून आजवर कुणीच सुटलेले नाही. जालना जिल्ह्यातील सतीश उर्फ लाला जैस्वाल हे त्याचे ठळक उदाहरण म्हणून घेतले जात आहे.

गुटखा बंदी लागल्यापासून प्रशासनाने काही धडक कारवाया केल्या, गाड्या पकडल्या, गुन्हे दाखल केले. पण या कारवायांनी फारसा परिणाम झालेला नाही. कारण, कारवाई फक्त थातुर-मातुर पातळीवर होत असून, मोठे जैस्वाल सारखे माफिया मात्र सुरक्षित आहेत. काही गाड्या पकडल्या जातात, तर उर्वरित गाड्या बिनधास्तपणे गुटखा पोहोचवत राहतात.

अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी गुटखा विक्रीविरोधात आवाज उठवला. वृत्तपत्रांतून सातत्याने बातम्या प्रसिद्ध झाल्या. तरीदेखील जैस्वालसारखे गुटखा माफिया मोकाट फिरत आहेत. यामागे पोलीस प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्याचा संशय बळावत आहे. गुन्हे दाखल करण्यास उशीर लावणे, आरोपींना पकडण्यात टाळाटाळ करणे, जामिनासाठी वेळ मिळवून देणे, अशा पद्धतीने माफियांना थेट 'सुविधा' दिल्या जात असल्याचे आरोप आहेत.

प्रतिबंधित गुटख्यावर कारवाई करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाकडे आहे. मात्र, या विभागाकडे मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे कारवाया अपुऱ्या राहतात. त्याचवेळी नियमांमध्ये झालेल्या बदलांमुळे पोलिसांनाही काही अधिकार मिळालेले आहेत. पण हे अधिकार वापरण्याऐवजी त्याचा गैरफायदा घेतल्याचे वास्तव समोर येत आहे.

गुटखा माफियांचे रूट बंद करण्याऐवजी पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे किंवा संगनमतामुळे हा व्यवसाय अधिकच फोफावत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, काही भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाल्याशिवाय गुटखा माफियांचे धाडस कमी होणार नाही.

तोवर जैस्वालसारखे माफिया निर्धास्तपणे फिरत राहतील आणि जालन्यात गुटख्याचा काळा धंदा दिवसेंदिवस बळावतच राहील.

## नवरात्रोत्सवानिमित्त भक्तगणांमध्ये उत्साह





**जालना । प्रतिनिधी -** उद्या (२२ सप्टेंबर, २०२५) पासून सुरू होणाऱ्या शारदीय नवरात्रोत्सवासाठी भक्तगणांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये देवीच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू आहे. शहराच्या विविध भागांमध्ये मूर्ती विक्रेते आणि घटस्थापनेचे साहित्य विकणाऱ्या दुकानांवर भाविकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

देवीच्या विविध रूपांतील सुबक मूर्ती, तसेच घटासाठी लागणारे मातीचे घट, नारळ, साड्या, फुलांच्या माळा आणि इतर पूजा साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडले आहेत. यंदा अनेक ठिकाणी देवीच्या मूर्तींना खास आकर्षक रूप देण्यात आले आहे, ज्यामुळे मूर्ती खरेदी करताना भाविक विशेषतः उत्साही दिसत आहेत.

यंदाच्या नवरात्रोत्सवात पारंपरिकतेसोबतच आधुनिकतेचाही संगम दिसून येत आहे. अनेक मंडळांनी आकर्षक रोषणाई आणि देखाव्यांची योजना केली आहे. कोरोना महामारीनंतर पहिल्यांदाच सर्व निर्बंध हटवल्यामुळे यंदाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होण्याची शक्यता आहे. देवीच्या आगमनाने शहरात एक वेगळेच चैतन्य पसरले आहे.

## शारदीय नवरात्र महोत्सव उत्साहात सुरू- प्रदीप बोराडे



**मंठा । प्रतिनिधी-** शहरात भक्तिमय वातावरणात शारदीय नवरात्र महोत्सवाची सुरुवात झाली आहे. मंदिरांत देवीच्या मूर्तींची सुंदर सजावट करण्यात आली असून, सर्वत्र मंगलध्वनी आणि आरती सुरू आहेत.

२२ सप्टेंबरपासून ते बुधवार १ आक्टोबरपर्यंत शारदीय नवरात्र महोत्सव साजरा होत आहे. यावर्षी तृतीया तिथीची वृद्धी म्हणजे ही तिथी दोन दिवस सूर्योदयाला असल्याने नवरात्रोत्सव दहा दिवसांचा झाला आहे. या महिन्याच्या प्रारंभी पृथ्वीच्या 'निर्मितीशक्ती'ला वंदन व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'शारदीय नवरात्र उत्सव' साजरा केला जातो.

नवरात्रोत्सव हा देवीच्या नऊ दिवसांच्या व्रतांसाठी ओळखला जातो. अनेक भक्त देवीला प्रसन्न पान २ वर

## मनपाच्या निष्काळजीपणामुळे शहरवासियांवर संकट

### नगर रचनाकार, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असला तरी त्याचा फटका थेट शहरवासीयांना बसला आहे. सलग झालेल्या मुसळधार सरींमुळे शहरातील अनेक घरात पाणी शिरले, तर अंडरग्राउंड असलेल्या कॉम्प्लेक्समध्ये पाणी तुंबून कोटींचे नुकसान झाले. व्यापारी, छोटे दुकानदार आणि रहिवासी यांचे प्रचंड हाल झाले, परंतु महानगरपालिकेने अद्यापही पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. हीच खरी शोकांतिका आहे.



**नगररचनाकार बेपर्वाह -** शहरात उभारण्यात आलेल्या अनेक अंडरग्राउंड कॉम्प्लेक्सना परवानग्या देताना पावसाच्या पाण्याचा निचरा होतो की नाही याची तपासणीच झालेली नाही. पावसाळ्यात या इमारती पाण्याखाली जातील याची दखल न घेता परवानग्या दिल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

**स्वच्छता विभागाचे अपयश -** नाल्यांची स्वच्छता पावसाआधी करणे ही नगरपालिकेची जबाबदारी. परंतु प्रत्यक्षात सफाई झालीच नाही. केवळ कागदोपत्री खर्च झाल्याचे स्पष्ट होत आहे. नाले तुंबले, पाणी शहरात शिरले आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागला.

**विभागीय चौकशीची मागणी -** या सर्व घटनांमुळे नागरिकांच्या मनात प्रचंड रोष आहे., कोणत्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे संकट ओढवले?, कॉम्प्लेक्सना परवानगी देताना कोणत्या निकषांकडे दुर्लक्ष झाले?, स्वच्छतेसाठी झालेले खर्चाचे हिशेब कागदावरच का राहिले?, या सर्व मुद्द्यांवर विभागीय चौकशी होऊन दोषींवर कारवाई करणे अपरिहार्य आहे. जालना शहरात झालेल्या मुसळधार पावसाने हवामानातील बदलांचे वास्तव अधोरेखित केले, परंतु त्याहून मोठे वास्तव म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांची निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचाराची सावली. पाण्याने व्यापाऱ्यांचे कोटींचे नुकसान केले असले तरी प्रशासनाच्या या बेपर्वाईने नागरिकांचा विश्वासच वाहून नेला आहे.

### मोतीगव्हाण मध्ये १ कोटी १० लाखांचे विकास कामाच्या लोकार्पणसह सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत विविध उपक्रम

## विकास हीच आमची प्राथमिकता, सरकार शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भाजपा जालना महानगर ग्रामीण मंडळाच्या वतीने सेवा पंधरवाडा अभियानांतर्गत मौजे मोतीगव्हाण ता. जालना येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महा रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण तसेच एकूण रु. १ कोटी १० लाखांच्या विकासकामांचे लोकार्पण माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ. कैलास गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, सतीश जाधव, नगरसेवक शशिकांत घुगे, मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे आदींची उपस्थिती होती. हा कार्यक्रम दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू होऊन रात्री ५ पर्यंत मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग दिसून आला. रक्तदान शिबिराला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तर आरोग्य तपासणी शिबिरामध्ये अनेक रुग्णांनी तपासणी करून घेतली. स्वच्छता अभियानामुळे गावात स्वच्छतेबाबत जागृती झाली तसेच पान २ वर



## प्रगतीची दालने खुली करायची असेल तर व्यवसायाशिवाय पर्याय नाही - राजेंद्र कोंढरे

### मराठा समाजासाठी कर्ज साक्षरतेच्या प्रशिक्षणात विविध विषयावर विचारमंथन-अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** मराठा समाज हा २८ टक्के आहे. कुणबी समाजासह ही संख्या ३५ ते ३७ टक्के होते. जर देशाच्या आर्थिक विकासातून शंभर रुपये निर्माण होत असतील, तर त्यातील ३७ रुपये समाजाच्या खिशात आले पाहिजेत. मात्र, हा बॅकलॉग आजही प्रलंबित आहे. त्यामुळे प्रगतीची दालने खुली करायची असतील तर सर्विस सेंटर व व्यवसायाशिवाय पर्याय नाही, असा सल्ला अखिल भारतीय मराठा महासंघाचे राजेंद्र कोंढरे यांनी दिला.

रांजणगाव (जि. पुणे) येथे अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे रविवार दि. २१ सप्टेंबर रोजी कर्ज घेण्यापूर्वीची, घेतल्यानंतरची व फेडेपर्यंतची साक्षरता या महत्त्वपूर्ण विषयावर श्री. कोंढरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते, उद्घाटन सत्रात ते बोलत होते. याप्रसंगी चार्टर्ड अकाउंटंट डी. एस. बोरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे प्रतिनिधी सचिन खोजे, महासंघाचे संयुक्त सरचिटणीस गुलाब गायकवाड, जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, पुणे जिल्हाध्यक्ष अंकुश लांडे, शिरूर तालुका पदाधिकारी व जिल्हा सरचिटणीस भास्कर पुंडे, तालुकाध्यक्ष शामकांत वर्पे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश शिंदे, युवक अध्यक्ष राहुल शिंदे, महिलाध्यक्ष अर्चना डफळ, जिल्हा उपाध्यक्ष वर्षा काळे, उर्मिला फलके, ज्योती वाळके, मंगेश मोरे, सुरेश पतंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. कोंढरे म्हणाले की, कर्ज व्यवस्थापनाच्या बाबतीत कोणत्याही बँकेची अडचण नसते. मात्र, कर्जाचे योग्य नियोजन आणि वेळेवर परतफेड करण्यासाठी तीन गोष्टी शिकणे गरजेचे आहे. त्या म्हणजे कर्ज घेण्यापूर्वीची साक्षरता, कर्ज घेतल्यानंतरचे व्यवस्थापन, कर्ज फेडेपर्यंतची शिस्तबद्धता आणि कर्जाचे व्यवसायात पान २ वर



# बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३८ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. जयंतीदिनी कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मानहानीचे मानकरी..!

...भारत-पाकिस्तान या दोन्ही संघात क्रिकेटच्या स्टेडियममध्ये होणारी लढत ही सीमेवरील संघर्षासारखीच तीव्र असते. एखादा सैनिक हातात रायफल घेऊन रणांगणात उतरतो, त्याचप्रमाणे कोट्यवधी जनतेच्या अपेक्षांचे ओझे खांद्यावर घेऊन दोन्ही संघ ही लढत खेळायला मैदानात उतरत असतात. प्रत्येक लढतीत भारताने पाकिस्तानला चारीमुंड्या चीत करावे अशी तमाम देशवासीयांची अपेक्षा असते. लढत जसजशी पुढे सरकू लागते, तसतसे स्टेडियममध्ये, घराघरांत टीव्हीपुढे बसून सामना बघणाऱ्या कोट्यवधी प्रेक्षकांचे रक्तही उसळू लागलेले असते. लढतीत कधी भारताचे पारडे जड तर कधी पाकिस्ताने पारडे जड होताच प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोकेही धडधडू लागतात. संपूर्ण स्पर्धेतला हा एकमेव सामना असतो जिथे खेळाडूंना आपल्या कौशल्यापेक्षा आक्रमकतेवर जास्त भार द्यावा लागतो. कधीकाळी भारत-पाकिस्तान हे दोन्ही संघ तुल्यबळ असताना असे चुरशीचे अनेक सामने बघायला मिळायचे. परंतु आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. क्रिकेटच्या मैदानात भारताला कडवे आव्हान देण्याची भाषा करणाऱ्या पाकिस्तानी संघाच्या आता फक्त तोंडातच बळ उरले आहे. याचे प्रत्यंतर सध्या यूएईत सुरू असलेल्या आशिया चषकात पावलोपावली दिसून येत आहे.

भारत-पाकिस्तान हे एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी गेल्या आठवड्यात आशिया चषकात आमने-सामने आले होते. मात्र, या सामन्याला रंजकतेपेक्षा जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याची किनार होती. गल्ली क्रिकेट खेळणाऱ्या लिंबूटिंबू संघाला त्यांची जागा दाखवून द्यावी त्याप्रमाणे चॅम्पियन टीम इंडियाने या सामन्यात पाकिस्तानी संघाला पराभवाची धूळ चारली. एवढेच नाही तर, कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यासह संपूर्ण भारतीय संघाने आपला करारी बाणा दाखवत पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा आणि इतर पाक खेळाडूंशी हस्तांदोलन करण्याचे टाळले. या प्रकारामुळे क्रिकेट जगतात पाकिस्तानची प्रचंड मानहानी झाली. या मानहानीचा धक्का जिव्हारी लागलेला पाकिस्तानचा संघ अजूनही त्यातून बाहेर येऊ शकलेला नाही. सामन्याच्या सुरुवातीलाच टॉस उडवताना सूर्यकुमार यादव हाताची घडी घालून उभा होता. यावेळी त्याने पाकच्या कर्णधाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. यानंतर खेळलेल्या संपूर्ण सामन्यात भारतीय संघाचाच वरचष्मा दिसून आला. आधी मैदानात आणि सामना संपल्यावर ड्रेसिंग रुममध्ये परतताना भारतीय संघाने आत्मविश्वास व कौशल्याचा अभाव असलेल्या पाकच्या संघाला त्यांची जागा दाखवून दिली. रागाने लाल झालेला पाकिस्तानी संघ सध्या या अपमानाचा बदला घेण्याचा हरत-हेने प्रयत्न करतोय, परंतु अद्याप तरी त्याला यश आलेले नाही. कोड ऑफ कंडक्टनुसार त्या सामन्याचे सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांनी भारतीय संघ आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांना दंड आकारून कारवाई करण्याची गरज होती. परंतु पायक्रॉफ्ट यांनी तसे न केल्याने त्यांच्यावरच कारवाई करावी, अशी मागणी पाकिस्तानी संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) केली. परंतु ही मागणी करताना सध्या आयसीसीचा बॉस कोण आहे, हे कदाचित पाकचे मठ्ठ व्यवस्थापन विसरले असावे. आयसीसी चेअरमन जय शहा यांनी पाकच्या मागणीला जराही भीक घातली नाही. त्यानंतर पाकिस्तानने थेट स्पर्धेवरच बहिष्कार टाकण्याची धमकी दिली. आशिया चषकाचे आयोजनकर्ते युनायटेड अरब अमिरात असले, तरी ही स्पर्धा यावेळी पाकिस्तानात होणार होती. परंतु भारताने पाकिस्तानात खेळण्यास नकार दिल्याने ही स्पर्धा यूएईत खेळवण्यात येत आहे. याआधी पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफी आयोजित करूनही भारताने प्रत्येक सामने यूएईत खेळत पाकच्या नाकावर टिच्चून ही स्पर्धा जिंकून दाखवली होती. भारताने पाकिस्तानमध्ये सामने खेळावेत यासाठी पाकने खूप विनंत्या अर्ज केले, तेव्हाही त्यांनी बहिष्काराची धमकी दिली होती. परंतु भारताच्या ताठ बाण्यापुढे त्यांची डाळ शिजू शकली नाही. भारत पाकिस्तानात न गेल्यामुळे पाकला प्रचंड नुकसान सहन करावे लागले. या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने स्टेडियमच्या उभारणीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले होते. हा खर्च या स्पर्धेतून भरून न निघाल्यामुळे सध्या पाक क्रिकेट बोर्डाची अवस्था दिवाळखोरीत गेल्यासारखी झालेली आहे. त्यातच स्पर्धा सुरू असताना आशिया चषकातून माघार घेतल्यास मोठ्या दंडाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे पाकच्या संघाने यूएईच्या सामन्याआधी बहिष्काराची नौटंकी केली आणि तासाभराने सामना खेळायला ते मैदानात उतरले.

आयसीसीने आशिया चषकातील उर्वरित सामन्यांमधून सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना हटवण्याची पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची मागणी स्पष्ट शब्दात फेटाळून लावली आहे. आशियाई क्रिकेट परिषदेच्या अधिकाऱ्यांना ज्यामध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या संचालकांचाही समावेश होता, त्यांना दोन्ही संघांचे कर्णधार सामन्यानंतर हस्तांदोलन करणार नाहीत याची आधीच कल्पना होती. तरीही, पाक क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्वी, माजी क्रिकेटपटू रमीझ राजा यांनी या प्रकरणावरून वाद निर्माण केला. परंतु आयसीसीच्या दणक्यानंतर आता पाक बोर्डाने आपला मोर्चा सूर्यकुमार यादवकडे वळवला आहे. सामना झाल्यानंतरच्या पत्रकार परिषदेत हा सामना आम्ही पहलगामच्या हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना समर्पित करत असल्याचे वक्तव्य सूर्यकुमारने केले होते. या वक्तव्याने पाकच्या बुडाला चांगल्याच मिरच्या झोंबल्या आहेत. त्यामुळे किमान सूर्यकुमारला दंड तरी करा अशा पाकच्या कु कुचाळक्या सुरू आहेत. आम्ही मैदानात स्पोर्टमनश् स्पिरिट दाखवतो, खेळभावनेने मैत्रीचा हात पुढे करतो आणि भारत जाणीवपूर्वक खेळाच्या मैदानात राजकीय विषय आणून वातावरण खराब करत असल्याची रडकथा पाक गात आहे. खरे तर ही फक्त झाँकी आहे, अजून खूप मानहानी व्हायची बाकी आहे. रविवारी सुपर फोर फेरीत भारत-पाक पुन्हा आमने-सामने येतील. तेव्हा भारताला मैदानात हरवण्याचा विचार दूरचीच बात, पाकच्या संघाने नवीन अपमान गिळण्याच्या तयारीत रहावे हे नक्की...!!

**शिवाजी विठ्ठल चौगुले**
**कागल- कोल्हापूर**

# स्वत:ला ज्ञानी समजणारे महाभाग पक्के अज्ञानी

आपल्या येथे भरपूर शिकलेल्या मुलांना किंवा सुशिक्षित नोकरदारांना ज्ञानी, हुशार, जाणकार व बुद्धिमान प्राणी समजण्याचा एक गोड व चुकीचा गैरसमज आहे. शिकलेले महाभाग म्हणजे ज्ञानी आणि न शिकलेले महाभाग म्हणजे अज्ञानी. असे आपण तुलनात्मक सहजपणे म्हणतो. शिकलेल्या सुशिक्षित महाभागांना सगळ्या गोष्टींची परिपूर्ण जाणीव व माहिती असते. त्यांना विविध क्षेत्रातील संपूर्ण नॉलेज व आकलन असते. अधिक शाळा शिकल्यामुळे त्यांच्यावर संस्काराचा प्रभाव अधिक प्रमाणात झालेला असतो. त्यामुळे शिकलेली मुले व नोकरदार महाभाग सुसंस्कारी ज्ञानी, गुणी व बुद्धिमान निपजत असल्याचा गैरसमज आपल्याकडे प्रचलित आहे. पण असे समजणे साप चुकीचे व खोटे आहे. यांच्या तुलनेत जे महाभाग अडाणी, अज्ञानी व कधीच शाळेची पायरी न चढलेली मुले म्हणा किंवा अडाणी युवक म्हणा यांना समाजात, गावात व कुटुंबात कसे वागावे व कसे बोलावे? समाजात व गावात कसे वावरावे? याचे जरासे ही ज्ञान व भान अल्पशिक्षित, अडाणी व अज्ञानी मुलांना व युवकांना नसते, असे आपण समजतो. कारण त्यांनी शाळेत शिक्षण जास्त न शिकल्यामुळे किंवा त्यांच्यावर शालेय संस्काराचा अभाव असल्यामुळे त्यांना समाज सुशिक्षित युवकांच्या तुलनेत कमी समजतो. त्यांना सार्वजनिक ठिकाणी अपमानित करून बोलतो. त्यांची उपहासात्मक चेष्टा करतो. तुला माझ्या इतके काय कळते? तू माझ्या एवढे शिक्षण शिकलास का? माझे शिक्षण खूप झालेले आहे. मी अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. असे सुशिक्षित युवक अडाणी व अल्पशिक्षित मुलांना मोठ्या ऐटीने ठणकावून सांगतात. आणि हे सुशिक्षित नोकरदार अल्पशिक्षित व अज्ञानी युवकांना कमी समजून त्यांची उपहासात्मक चेष्टा करतात आणि स्वतःला ज्ञानी व हुशार समजतात. परंतु आजकाल जर विचार केला तर सुशिक्षित मुलांपेक्षा व नोकरदारांपेक्षा अल्पशिक्षित व अज्ञानी मुलेच हुशार म्हणायची वेळ आपल्यावर आलेली आहे. कारण सुशिक्षित मुलांना फक्त स्वतःच्या शिक्षणाचा व अर्धवट ज्ञानाचा गर्व चढलेला असतो. पण ते तेवढे ज्ञानी व हुशार कधीच नसतात. हा त्यांचा व लोकांचा त्यांच्याकडे त्यादृष्टीने बघण्याचा व त्यांना तसे समजण्याचा गैरसमज असतो. पण प्रत्यक्षात ते त्याप्रमाणे कधीच वागत नसतात. आणि अल्पशिक्षित व अडाणी मुले किंवा युवक भलेही ज्यादा शिकलेले नसतात परंतु समाजात व गावात कसे वावरावे? घरातील आई-वडिलांना व आजी-आजोबांना किंवा घरातील सदस्यांना बोलताना कोणते शब्द वापरावेत? आई-वडिलांनी आपल्यासाठी किती खस्ता खाल्ल्या व जिवाचे रान केले? या प्रश्नांची पुरेपूर उत्तरे त्यांच्याकडे असतात. त्यांना सामाजिक जाण व भान असते.सामाजिक देण या नात्याने आपल्याला सामाजिक योगदान देणे हे आपले परम कर्तव्य असते. हे परम कर्तव्य हे फक्त अज्ञानी व अडाणी लोकच तंतोतंत पाळतात. हल्ली आपण बघतो की, सुशिक्षित मुले अथवा सुशिक्षित नोकरदार बायकोचे ऐकून आई-वडिलांसोबत वाद घालत आहेत. त्यांना अंतर देऊन किंवा वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवून त्यांच्यापासून अलिप्त राहत आहेत. आई-वडिलांची काळजी घेणे तर लांबच. पण त्यांना तब्येतीची विचारणा करण्यासाठी साधा फोन देखील लावत नाहीत. आई-वडिलांनी आपल्याला लहानाचे मोठे करून एवढे बक्कळ शिक्षण शिकवले आणि आपल्याला नोकरीला लावले त्या आई-वडिलांच्या उपकारांची जाणीव आजकालची मुले व नोकरदार महाभाग ठेवत नाहीत. हीच खरी शोकांतिका आहे. याच गोष्टीचे मला राहून राहून दुःख वाटत असते. नोकरदार मुले आपल्या सख्ख्या शेतकरी भावाच्या मुलीच्या लग्नाला आर्थिक मदत करायला पुढे धजावत नाहीत. भावाच्या व सामाजिक गोरगरिबांच्या मुला मुलींच्या शिक्षणाला आर्थिक हातभार लावत नाहीत. काही नोकरदार महाभाग तर सख्ख्या भावाच्या मुलीच्या लग्नाला सुद्धा येत नाहीत. सामाजिक कार्यात भाग घेणे नोकरदार लोकांना कधीच आवडत नाही किंवा गरजू, दुःखी, पीडित, कष्टी, गोरगरीब, निराधार व विविध आजारांनी ग्रस्त लोकांना आर्थिक मदत करून त्यांना मानसिक आधार देणे हे त्यांचे सर्वोत्तम कर्तव्य असते. परंतु ते तसे न करता ढाब्यावर जाऊन पार्ट्या करणे, परस्त्रीशी संबंध ठेवणे, विविध नमुन्याच्या महागड्या दारू पिणे, बाया व मुली नाचवणे आणि श्रीमंत लोकांच्या लग्नात मोठे गिफ्ट देणे या गोष्टीत हे सुशिक्षित नोकरदार लोक आघाडीवर असतात. मग मित्रांनो तुम्हीच आता मला सांगा अशा लोकांना आपण सुशिक्षित म्हणावे तरी कसे? यांच्यात माणुसकी, सुसंस्कार व दानशूरपणा नसेल तर यांच्या ज्ञानाला व हुशारपणाला काय चाटायचे आहे? याउलट ज्यांना आपण अज्ञानी, अडाणी व अल्पशिक्षित समजतो. तीच मुले खरे सुसंस्कारी, चारित्र्यवान, मानवतावादी आणि समजदार व जाणकार असतात. त्यांना भलेही शालेय ज्ञान कमी असेल पण व्यवहारिक ज्ञान व सामाजिक व कौटुंबिक भान त्यांच्याकडे ठासून भरलेले असते. ते पैशाने जरूर गरीब असतात, त्यांच्याकडे पैसे भरपूर नसतात. परंतु ते आई वडिलांची सेवा करण्यात किंवा आई-वडिलांना आजारपणात आर्थिक मदत करण्यात कधीच कमी पडत नाहीत. दुःखी, पीडित, कष्टी व गरजू लोकांना शक्य होईल तेवढी मदत करण्यात ते अग्रेसर असतात. ते नोकरदार भावावर कधीच अवलंबून राहत नाहीत किंवा त्यांना स्वतःहून पैशाची मागणी करत नाहीत. आई-वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा समजून ते आई-वडिलांना जिवापाड जपतात, त्यांची मनोभावे सेवा करतात आणि त्यांचे सुख दुःख पाहतात. हल्लीची वस्तुस्थिती अशी आहे की, नोकरदार मुलांपेक्षा शेतकरी व अडाणी मुलांपाशीच आई-वडील आपला शेवटचा श्वास घेत आहेत. आई वडील मेल्यावर नोकरदार मुले एकतर वेळेवर अंत्यविधीला येत नाहीत आणि आले तरीही व्हीआयपी व शाही थाटात येतात. जणू काय एखाद्या मित्राचा जन्मदिवस किंवा जिवलग मित्राचे लग्न आहे. हे आपण सर्वजण पाहत आहोत, याला कोणीच नाकारू शकत नाही. मी पाहतोय की, शिकलेल्या नोकरदार मुलांपेक्षा अडाणी मुलांनाच व्यवहारिक ज्ञान जास्त असते. कारण त्यांचा संस्काराचा घडा अटोकाठ भरलेला असतात. अडाणी व अज्ञानी मुलांपाशी आई वडील असल्यामुळे त्यांच्यावर दररोज संस्काराचे मंत्र पडत असतात. म्हणून ते वागायला नेक व इमानदार असतात. सामाजिक कार्यात व लग्नकार्यात हिरीरीने भाग घेतात. मग तुम्हीच सांगा मित्रहो, अशिक्षित हुशार का सुशिक्षित हुशार? अशिक्षित मुलांकडे संस्काराचा खजिना जास्त आहे की, सुशिक्षित मुलांकडे? अशिक्षित मुलांमध्ये माणुसकी व दायित्व जास्त आहे की सुशिक्षित मुलांमध्ये? याचा विचार जर केला तर आपल्याला असे कळून येईल की, हल्ली सुशिक्षित मुलांपेक्षा अशिक्षित मुलेच पक्के ज्ञानी व हुशार असतात. शिक्षण शिकूनही जर मुले आई-वडिलांना बहिण भावांना, मित्र आप्तेष्ट व नातेवाईकांना ओळखत नसतील किंवा विसरून गेलेली असतील तर मग असे चारित्र्यहीन व संस्कारहीन आणि मानवताहीन शिक्षण काय कामाचे? शेवटी जाता जाता मला सुशिक्षित नोकरदार मुलांना एवढे सांगावे वाटते की, भावांनो आपल्या अज्ञानी, अडाणी अल्पशिक्षित, शेतकरी व कष्टकरी भावांचा वा समाज बांधवांचा आदर्श घेऊन आई-वडिलांची खूप खूप सेवा करा..बहीण भावांना आर्थिक मदत करा..आणि सामाजिक कार्यात स्वतःला झोकून द्या...स्वतःमध्ये असणारी मानवता ढळू न देता अधिक प्रबळ करा आणि सुशिक्षित, ज्ञानी व हुशार शब्दाला लागलेला कलंक पुसून काढा.....

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर , मो.७४९८७१५६६१**

पान १ वरुन

## विकास हीच ...

वृक्षारोपण उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळाली. यावेळी विकासकामांच्या लोकार्पणाचा समारंभही पार पडला. गावातील रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, शैक्षणिक सुविधा आदी कामांसाठी मंजूर झालेल्या १ कोटी १० लाखांच्या निधीतून झालेल्या विकास कामांचे लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भाजपाच्या माध्यमातून विकास हीच आमची प्राथमिकता आहे. जालना जिल्ह्यातील प्रत्येक भागात पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासह सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा निर्धार आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचवणे हीच खरी सेवा आहे. सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत आज जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत आणि त्यातून नागरिकांचे जीवनमान उंचावेल. जनतेच्या विश्वासाला आम्ही पात्र ठरू याची खात्री आहे. यावेळी मोतीगव्हाण येथील नागरिकांनी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमाला धनराज काबलिये, सुरेश लोळगे, सुधाकर खरात, परसराम तळेकर, डॉ. तुकाराम कळकुंबे, शिवा दादा शेजुळ, अनिल सरकटे, गजानन खरात, दत्ता घुले, काकासाहेब घुले, राजाभाऊ कळकुंबे, राजाराम जाधव, कैलास उबाळे, बद्रीनाथ भसांडे, ज्ञानेश्वर राठोड, रामजी शेजूळ, प्रतिक पोहेकर, दौलत भुतेकर, नारायण जाधव, निवृत्ती लंके, सतीश केळकर, सुनील पवार, वसंत शिंदे, हरिभाऊ गोरे, कपिल भुरेवाल, कृष्णा गायके, गोपाळ मोरे, मुकेश चव्हाण, नामदेव ढाकणे यांच्यासह ग्रामीण मंडळातील कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या अभियानाचे उत्कृष्ट आयोजन मोतीगव्हाण चे सरपंच श्री. विजय मोहिते व सखाराम मोहिते, सावळीराम मोहिते, अर्जुन मोहिते, महादेव मोहिते, नारायण मोहिते त्यांच्या मित्रपरिवाराने केले.त्यांच्या या पुढाकारामुळे गावात सामाजिक बांधिलकी जपत उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## प्रगतीची दालने ...

रूपांतर करून चांगले व्यवस्थापन. आगामी दहा वर्षात सरपंचकी, देशमुखी, पाटीलकी या पारंपरिक संकल्पना कालबाह्य ठरणार आहेत. समाजाने टिकून राहण्यासाठी व पुढे जाण्यासाठी गुणवत्ता, पैसा, सुख-समृद्धी आणि आरोग्य या मूल्यांचा स्वीकार करावा लागेल. मराठा समाजाने जातीवादी चौकट सोडून सर्वसमावेशक दृष्टी स्वीकारली, तरच खरी प्रगती साध्य होईल. समाजातील तरुणाईने उद्योजकतेकडे वळून आत्मनिर्भर होणे हेच काळाचे खरे आव्हान आहे.

या शिबिरात मनोगत व्यक्त करताना जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख म्हणाले की, कर्ज घेण्याबाबत समाजामध्ये अनेक गैरसमज आहेत. योग्य साक्षरता नसल्याने अनेक व्यवसाय थकबाकीत जातात. या प्रशिक्षणातून मिळालेली मार्गदर्शनाची दिशा नक्कीच समाजातील युवकांना उद्योजकतेकडे वळवेल. मराठा समाज आर्थिकदृष्ट्या सबळ व्हावा यासाठी अशा शिबिरांची नितांत गरज आहे, असे ते म्हणाले. उपस्थितांनी अशा सत्रांचे नियमित आयोजन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

## शारदीय नवरात्र ...

करण्यासाठी नऊ दिवस कडक उपवास ठेवतात. हा उपवास काहीजण फक्त फळे खाऊन करतात तर काहीजण केवळ पाण्यावर व्रत करतात. याकाळात अनेकजण चामड्याच्या वस्तू धारण करत नाहीत. तर नऊ दिवस व्रत करणारे भक्त यावेळी चप्पल घालत नाहीत. काहीजण गादीवर झोपत नाहीत. नवमी झाल्यानंतर दशमीला म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी देवीची पूजा करून घट विसर्जित केल्यानंतर हे व्रत सोडतात. ज्या भक्तांना नऊ दिवसांचे व्रत जमत नाही ते भाविक प्रथम दिवशी व अष्टमी नवमीचे व्रत करतात.नवरात्र उत्सवासाठी बाजारपेठेत पारंपरिक वस्त्र, दागिने, पुजेच्या सामग्रीसह फुलांची मोठी खरेदी होत आहे. शहरात सुरू असलेल्या नवरात्र महोत्सवानिमित्त

पोलीस प्रशासनाने सुरक्षेची काटेकोर व्यवस्था केली असून नागरिकांना शांतता व सुरक्षिततेत सण साजरा करण्याचे आवाहन केले आहे. नवरात्रोत्सवामुळे सर्वत्र आनंदोत्सवाचे वातावरण पसरले आहे.

शारदीय नवरात्र महोत्सवामुळे शहरासह ग्रामीण भागात भक्तिभाव, सांस्कृतिक उपक्रम आणि आनंदोत्सवाचे वातावरण पसरले असून, देवीच्या जयघोषात प्रत्येक ठिकाणी उत्साह आणि श्रद्धेची लहर अनुभवायला मिळत असल्याची प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव ठाकरे)चे तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी दिली आहे.

## वाचकांचे मनोगत

### वैद्यकीय शास्त्रातील गुणवत्तेत ढवळाढवळ नको?

वैद्यकीय शास्त्रातील अँलोपॅथीवर रुग्णालयातील सेवा अतिमहत्त्वाच्या गणल्या आहेत. एम.बी.बी.एस.,एम.डी.वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांचे अनन्य महत्त्व आहे.रुग्णांचा यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विश्वास आहे.म्हणूनच लोक उच्च शिक्षण घेतलेल्या डॉक्टरकडे उपचार घेतात. होमिओपॅथिचे प्रशिक्षक घेतलेल्या डॉक्टरांना रुग्णांवर अँलोपॅथीचे उपचार करता येतील या निर्णयाने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.वडाची साल पिंपळाला लावण्याचा प्रकार आहे. अँलोपॅथीचे प्रशिक्षण घेतलेल्या आणि घेणार्या डॉक्टरांनी त्या निर्णया विरुद्ध बंड पुकारले आहे.आयुर्वेदाचं शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांबाबतही पूर्वी प्रश्न निर्माण झाला होता. पण,त्यांच्या अभ्यासक्रमात अँलोपॅथीचा काही भाग असतोच असा युक्तिवाद झाल्याने प्रश्न मिटला .आता,होमिओपॅथीच्या डॉक्टरांनाही औषधशास्त्राचा एक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर अँलोपॅथीचे औषधोपचार करण्याची परवानगी दिली जाणार आहे.सरकारने आधीच्या वैद्यकीय शास्त्रातील पद्धती बदलू नयेत. व्यक्तिसापेक्ष निर्णय बदलू नयेत. रुग्णांच्या विश्वासार्हता आहेत तशाच अबाधित ठेवाव्यात. अँलोपॅथीवर माझा पूर्ण विश्वास आहे.कारण आजारातून लवकर बरा होण्याचा मार्ग आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून सर्व गुण संपन्न विद्यार्थी घडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे - आमदार संतोष दानवे

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - शिक्षकांनी आधुनिक




तंत्रज्ञानाची कास धरून सर्व गुण संपन्न विद्यार्थी घडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे असे प्रतिपादन पंचायत राज समितीचे अध्यक्ष आमदार संतोष दानवे यांनी केली जाफराबाद तालुक्यातील नळविहीरा जिल्हा परिषद शाळेत आयोजित बदली झालेल्या शिक्षकांचा सत्कार समारंभ आणि सेवा सप्ताह निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर होते तर यावेळी माजी शिक्षण सभापती राजेश चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य मधुकर गाढे, भारतीय जनता युवा मोर्चा तालुका अध्यक्ष विजय परिहार, दिपक वाकडे,कौसर शेख, उद्धव दुनगहू, मनोज शिंदे, सरपंच प्रीती जंजाळ, सोपानराव जंजाळ, रमेश गायकवाड, गीनानदेव महाराज,रमेश गाडेकर, ज्ञानेश्वर पवार, लक्ष्मण कोल्हे भीमराव जाधव,यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती नळविहीरा शाळेतून बदली झालेले सावता तिडके,सुनिता खलसे,भाऊसाहेब जाधव, प्रमोद कळंबे या शिक्षकांना शाळेच्या वतीने आणि गावाच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी पुढे बोलताना आमदार दानवे म्हणाले की प्रत्येकाने स्वच्छतेची सवय अंगी बाळगणे गरजेचे असून प्लास्टिकचा वापर बंद करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी सगळ्यांना दिला. याशिवाय नळविहीरा शाळेच्या भौतिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या शाळा खोल्या आणि इतर बाबींसाठी आपण प्राधान्याने निधी उपलब्ध करणार असल्याचे ते म्हणाले. यावेळी शाळेचा विद्यार्थी वैष्णव गाडेकर, सावता तिडके, सुनील गायकवाड,अविनाश गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तू मुनेमानिक यांनी केले, सूत्रसंचलन दीपक चव्हाण तर आभार शंकर गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक शिवहरी नागरे, दत्तू मुनेमाणिक, सुनील अंभोरे,काशिनाथ उखर्डे, विनोद कळंबे, दिपक चव्हाण, ज्ञानेश्वर झगरे, मंजुषा बकतकार,पूजा गहेरवाल यांच्यासह तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष अंबादास जाधव, अमोल मोरे, वसंता गाडेकर, दत्तू गाडेकर, परमेश्वर मोरे, सुनील गायकवाड, सुनील मोरे, प्रल्हाद गाडेकर, अंकुश गाडेकर, संतोष मोरे राजेश गाडेकर,दिगंबर मोरे, लिलाबाई जाधव ,आशाताई गायकवाड, आत्माराम लोखंडे,राजू गायकवाड, किरण गाडेकर, आकाश वाकोडे, साहेबराव मोरे, अनिल लोखंडे, दामोदर गाडेकर, संतोष गाडेकर, शिवाजी गाडेकर, अविनाश गायकवाड यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत आणि तंटामुक्त समिती च्या पदाधिकाऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# सत्यशोधक विद्यालयात मानवी साखळीने बनविले MISSION MATH



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना आणि शिक्षण विभाग जिल्हा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमानाने कॉपीमुक्त अभियानांतर्गत मैत्री गणिताशी मिशन मॅथ या उपक्रमाअंतर्गत मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था छत्रपती संभाजीनगर संचालित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे विषय गणित इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची शनिवार रोजी गणित विषयाची ४० गुणांची बोर्ड परीक्षेच्या धर्तीवर सराव परीक्षा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मानवी साखळीने चखड्खजछ चढक बनविले. या उपक्रमासाठी जालना माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, अधिव्याख्याता प्रमोद कुमावत यांच्या संकल्पनेतून तसेच गणित तज्ञ शिक्षक हरिदास निकम, निलेश कंकाळ, दत्तात्रय सपकाळ, चं दायमा इतर गणित शिक्षक यांच्या मदतीने हा उपक्रम पूर्ण जालना जिल्ह्यात राबविला जात आहे. यावेळी संस्थेचे संस्थाचालक तथा प्राचार्य सुनील वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव जयश्री बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी पर्यवेक्षक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# टेंभुर्णी येथील दत्तनगर शाळेत स्टार स्पोर्ट गणवेश वाटप



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - जिल्हा परिषद प्रा शाळा दत्तनगर टेंभुर्णी येथे विद्यार्थ्यांना स्टार स्पोर्ट चे गणवेश वाटप करण्यात आले यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष योगेश गडकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की विद्यार्थ्यांना या एस्टार स्पोर्ट गणेशामुळे विविध खेळांना सुद्धा चालना मिळते व या गणेशामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसडून वाहत होता यावेळी उपस्थित प्रभारी मुख्याध्यापक सौ. लोखंडे मॅडम सौ. उगले मॅडम श्रीकृष्ण आवळे सर रेणुका माता संस्थान च्या संचालिका सौ. सखुबाई छबुराव कांबळे सौ. सरस्वती देशमुख व शालेय समिती सदस्य शंकर भाऊ सोनसाळे व शालेय समिती सदस्य शेख भैय्या व शेक मॅडम व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मास्वेचे समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकरिता पुणे येथे धरणे आंदोलन

**पुणे** - राज्यातील समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) संघटनेतर्फे उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथे बुधवार दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ, सेवांतर्गत प्रगती योजना क्स च्या शासन निर्णयात सुधारणा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास मंजुरी, एच टी सेवार्थ प्रणालीद्वारे दरमहा वेतन, प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करणे, एनपीएस अंतर्गत रुग्णता उपदान, सेवा निवृत्ती वेतन योजना लागू करणे, सहाय्यक ग्रंथपालांच्या वेतन श्रेणीत सुधारणा, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना आदी प्रलंबित मागण्यांची, शासनाने आश्वासन देऊनही पूर्तता न केल्यामुळे मास्वे ने धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असून याबाबत ची नोटीस अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई आणि संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना ४ सप्टेंबर च्या पत्रान्वये देण्यात आली असून ही बाब राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना कळविण्यात आली आहे.

# मानवी प्रगतीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन हा महत्त्वाचा पाया - डॉ विशाल तायडे



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद** - विज्ञान म्हणजे केवळ प्रयोगशाळेतील शोध किंवा यंत्रे नव्हे; तर तर्कशुद्ध विचार, पुराव्यावर आधारित निर्णय आणि निसर्गातील नियम समजून घेण्याची वृत्ती हीच खरी वैज्ञानिक वृत्ती आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे वस्तुनिष्ठ, तर्कशुद्ध आणि शंका विचारणारी विचारसरणी. अंधश्रद्धा, परंपरा किंवा केवळ भावनेवर आधारित निर्णय न घेता का?, कसे?, पुरावा काय? असे प्रश्नांची उत्तरे वस्तुनिष्ठपणे शोधणे होय असे प्रतिपादन राज्य आंग्ल भाषा संस्थेचे विभागप्रमुख डॉ विशाल तायडे यांनी केले.

छत्रपती संभाजी विद्यालय वाकुळणी येथे कर्मयोगी अंकुशराव टोपे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालनाचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ प्रमोद कुमावत हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप जगरवाळ यांनी भूषविले.

पुढे बोलताना तायडे म्हणाले अंधश्रद्धाविरोधी शक्ती, जादूटोणा, ग्रह-शांती, अपशकुन यांसारख्या अंधविश्वासांना विज्ञानच आव्हान देत असते. आरोग्य, शेती, शिक्षण, उद्योग या सर्व क्षेत्रांत वैज्ञानिक विचारसरणीमुळेच नवी कल्पकता आणि विकास घडत असतो.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व चरित्र निर्माण या विषयावर डॉ. प्रमोद कुमावत यांनी पंचकोश विकास विद्यार्थ्यांसमोर मांडला. विद्यार्थ्यांना योग्य आहाराची माहिती दिली तसेच ऊर्जा व मानसिक आरोग्य कसे अबाधित ठेवता येईल याविषयी मार्गदर्शन केले. जीवन म्हणजेच संस्कार संचय होय. संस्कार हे एका दिवसात घडत नसते तर त्यासाठी सतत चांगल्या गुणांचे अनुकरण करावे लागते असे ते म्हणाले. माहिती म्हणजे ज्ञान नव्हे. आज माहितीचा प्रस्फोट झाला आहे परंतु तरूण ज्ञानवंत होतांना दिसत नाहीत. मोबाईलच्या आहारी मुलांनी न जाता पुस्तकांच्या विश्वात रमले पाहिजे असेही डॉ कुमावत म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन भोंडे यांनी केले तर प्रास्ताविक संजय पठाडे यांनी केले.यावेळी वक्तृत्व स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संजय भवने, दिपक कुरील यांच्यासह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# मराठवाडा विभाग स्तरीय एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स तर्फे टेक्निकल व पंच सेमिनार शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स महासंघ भारत यांच्या तर्फे मराठवाड्यात देखील या खेळ प्रकाराचा प्रचार,प्रसार व्हावा व यातून राज्य,राष्ट्रीय पातळी वरील खेळाडू तैयार व्हावे या उद्देशाने मराठवाड़ा एल्बो बॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे विभाग स्तर टेक्निकल, जज,रेफरी सेमिनार २१ सप्टेबर २०२५ रोजी जालना येथील अरुणिमा गुरुकुल स्कूल येथे पार पडले.

या शिबिराला राष्ट्रीय एल्बो बॉक्सिंग महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश कोळी सर यांचे मार्गदर्शन लाभले. या सेमिनार मध्ये बेसिक ते एडवांस बॉक्सिंग ची माहिती शिबिरार्थीना देण्यात आली. या शिबिरात छ. संभाजी नगर, जालना,परभणी,बीड येथील पंचांनी सहभाग नोंदविला. या वेळी अरुणिमा गुरुकुल चे संचालक बाळासाहेब तनपुरे,अक्षय तनपुरे, मराठवाड़ा एल्बो बॉक्सिंग चे प्रा.डॉ. नितिन भक्त, भूषण यादव,परभणी चे रोहित जैसवाल,छ. संभाजी नगरचे अशोक सर, जालना चे निवांत नंदाने,तन्मय सतिकर,मुकुंद यादव उपस्थित होते.



## आळंदी येथे वारकरी आणि धार्मिक शिक्षण संस्था यांचे संमेलन उत्साहात!

# हिंदूंनो, वारकरी संप्रदाय अन् हिंदु धर्मविरोधी 'फेक नरॅटिव्ह' हाणून पाडा ! - रमेश शिंदे

**आळंदी । प्रतिनिधी** - सध्या धार्मिकता आणि आधुनिकतावाद यांमध्ये संघर्ष चालवला जात आहे. आताच्या माहितीयुगात आपण आपल्या मोबाईलमध्ये येणारी माहिती खरी आहे का ? योग्य आहे का ? याची खात्री करत नाही. त्यामुळेच 'खोटे नरेटिव्ह' (खोटे कथानक) बनवले जातात आणि पसरवले जातात. सध्या 'चॅट जी.पी.टी.'सारख्या 'ए.आय.'चा (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर चुकीची माहिती पसरवण्यासाठी केला जात आहे. आजच्या जगात चुकीची माहिती पसरवणे हे सर्वात मोठे शस्त्र म्हणून वापरले जाते. तरी यापुढील काळात हिंदूंनी जागरूक होऊन वारकरी संप्रदाय अन् हिंदु धर्मविरोधी 'फेक नरॅटिव्ह' हाणून पाडावे, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी केले.

आळंदी येथील फ्रुटवाले धर्मशाळा येथे २० सप्टेंबर या दिवशी 'वारकरी आणि धार्मिक शिक्षण संस्था' यांचे संमेलन उत्साही आणि भावपूर्ण वातावरणात पार पडले. त्या वेळी ते बोलत होते. 'सनातन विद्या फाऊंडेशन', 'हिंदु जनजागृती समिती', 'राष्ट्रीय वारकरी परिषद' आणि 'स्वराज्य संघ' यांच्या संयुक्त विद्यमाने संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक फाऊंडेशनचे श्री. प्रकाश लोंढे यांनी केले. या संमेलनासाठी माजी सनदी अधिकारी (खड) आणि 'चाणक्य मंडल'चे श्री. अविनाश धर्माधिकारी, हिंदु जागरण मंचचे डॉ. अंकुश अगरवाल, महाराष्ट्र राज्य वारकरी मंडळाचे ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, विश्वविक्रमी-शिव व्याख्याते ह.भ.प. बाजीराव बांगर महाराज, प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पिठासन धर्माधिकारी श्री. प्रसाद पंडित गुरुजी, ह.भ.प. माणिक महाराज मोरे, श्री. गिरीशभाऊ कारेकर, ह.भ.प. बाळासाहेब शेळके, प्रखर हिंदुत्वनिष्ठ श्री. संजयशेठ थोरात, ह.भ.प. बाळासाहेब मोरे, ह.भ.प. चैतन्य महाराज कबीर, ह.भ.प. संग्रामबापू भंडारे, ह.भ.प. घुंडरे पाटील महाराज, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे कार्याध्यक्ष ह.भ.प. बापू महाराज रावकर यांसह ४०० हून अधिक वारकर्यांची उपस्थिती होती.

**तुम्हाला धर्मापासून दूर करायचे षड्यंत्र चालू आहे ! - अविनाश धर्माधिकारी**

'सर्वेत्र सुखीनः सन्तु', हे केवळ हिंदु धर्मात आहे, अन्य पंथात हे नाही. इतर पंथ 'केवळ आमचाच ईश्वर खरा आहे, तुमचा धर्म खोटा, मागासलेला आहे', असे म्हणतात. तुम्हाला तुमच्या धर्मापासून दूर करायचे किंवा मारून टाकायचे असेच षड्यंत्र चालू आहे. यासाठी जागतिक शक्तींकडून त्यांना आर्थिक पुरवठा होत आहे. जर सर्व जगात सुख शांती नांदायला हवी असेल, तर हिंदु धर्मच हे देऊ शकतो, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

**जिहादी षड्यंत्राच्या विरोधात कीर्तनकारांनी प्रबोधन करावे ! - डॉ. अंकुश अगरवाल**

जिहादींनी गणेशोत्सवात गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांवर आक्रमण केले. आषाढी वारीत खोटे फलक लावले, वारीतील वारकर्यांवर मांसाचे तुकडे फेकले गेले, 'भजन, कीर्तन आणि आरती करायची नाही', असे काही जिहादी जेथे त्यांची बहुसंख्याने वस्ती आहे अशा ठिकाणी सांगत आहेत. या षड्यंत्रांच्या विरोधात वारकरी संप्रदायातील कीर्तनकारांनी प्रत्येक कीर्तनात जनतेचे प्रबोधन करावे.

**छत्रपती शिवाजी महाराजांना सेक्युलर दाखवण्याचे खोटे कथानक पसरवले जात आहे! - ह.भ.प. बाजीराव बांगर महाराज, विश्वविक्रमी-शिव व्याख्याते**


पाच पातशाह्यांच्या जुलमी अत्याचाराला विरोध करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी बालवयातच स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली. त्यासाठी त्यांनी अवघ्या १० जणांना घेऊन पुढे त्यांनी हिंदूंचे मोठे स्वराज्य उभे केले. यात लाखोचे सैन्यदल, मोठे हेर खाते होते. असे असतांना छत्रपती शिवाजी महाराजांना आता 'सेक्युलर' (धर्मनिरपेक्ष) दाखवण्याचे षड्यंत्र चालू आहे. त्यात मदरी मेहतरचे पात्र जोडले जात आहे. अशी अनेक खोटी कथानके पसरवली जात आहेत. हे सर्व कोण करत त्याची चौकशी केली पाहिजे आणि ते हाणून पाडले पाहिजे.

**'धर्मासाठी जगा आणि धर्मासाठी मरा', ही शिकवण आचरणात आणण्याची आवश्यकता! - ह.भ.प. माणिक महाराज मोरे, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे १० वे वंशज**

'धर्माचे कारण करणे पाखंड खंडण', असे जरी असले तरी हिंदू कधी पाखंड खंडण करत नाही. १२ व्या शतकापासून हिंदूंवर अनेक आक्रमणे होत आहेत. त्या वेळी १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वर माऊलींनी भागवत धर्माचा पाया रचला, तर १६ व्या शतकात संत तुकाराम महाराज यांनी भागवत धर्माची वाढ करण्यासाठी अविरत प्रयत्न केले. त्याप्रमाणे 'धर्मासाठी जगा आणि धर्मासाठी मरा', ही शिकवण आज आचरणात आणण्याची आवश्यकता आहे.

**मंदिरांचे विश्वस्तांनी रामायणातील भरताप्रमाणे असावे ! - श्री. दिलीप देशमुख, माजी धर्मादाय आयुक्त**

मंदिरांचे विश्वस्त म्हणजे रामायणातील भरतासारखे असावेत. भरताप्रमाणे कारभार चालवावा.



भरताने ज्याप्रकारे राज्य कारभार केला त्याप्रमाणे विश्वस्तांनी संस्था चालवल्या, तर सर्वच संस्था चांगल्या चालतील.

**काही लोक अर्बन नक्षलवादी बनून हिंदु धर्म संपवण्याचे कारस्थान करत आहेत ! -श्री. सुनील घनवट, राज्य संघटक, महाराष्ट्र आणि छत्तीसगड, हिंदु जनजागृती समिती**

हिंदु धर्मातील काही लोक अर्बन नक्षलवादी बनून हिंदु धर्म, वारकरी संप्रदाय संपवण्याचे कारस्थान करत आहेत. गेली काही वर्षे पंढरीच्या वारीत तथाकथित 'समता दिंडी' काढून त्यात अर्बन नक्षलवाद्यांना विषय मांडण्यासाठी संधी दिली जात आहे. या माध्यमांतून वारीत संत, वारी आणि धर्म यांविषयी चुकीची माहिती पसरवली जात आहे. याला आमचा विरोध आहे. या वेळी सर्व उपस्थितांनीही हात उंचावून 'आम्ही हे चालू देणार नाही', असे एकमुखाने सांगितले.

तर श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीच्या विश्वस्त अधिवक्त्या रोहिणी पवार म्हणाल्या की, कोणत्याही संघटनेचे कार्य चालू ठेवायचे असेल, तर आर्थिक साहाय्य लागते. धर्मादाय आयुक्त कार्यालयातून संस्था नोंदणीकृत झाल्यावर वारकरी संस्था, भजनी मंडळ, दिंड्या यांना साहित्य खरेदी करण्यासाठी या निधीचा उपयोग होऊ शकतो.

तर लेखा परिक्षक (उ) श्री. राम डावरे म्हणाले की, निधी मिळण्याविषयी सरकारने केलेले कायदे वारकरी संप्रदायासाठी थोडे शिथिल करण्याची आवश्यकता आहे. 'वारकरी मुक्त विद्यापीठ' स्थापन करून शिक्षण देण्याची आवश्यकता आहे.





जालना येथे सुरू असलेल्या धनगर समाजाच्या उपोषण स्थळी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी भेट दिली यावेळी विविध भागातून उपोषण करते दीपक बोन्हाडे यांना पाठिंबा देण्यासाठी आलेला जनसमुदाय छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र अनिल व्यवहारे)

## नकुल काफरे बृहन्मुंबई महानगरपालिकेत वरिष्ठ स्टेनोग्राफर पदावर

**जालना -** जालन्याच्या नकुल अर्जुन काफरे यांनी परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर शासकीय सेवेत यश मिळवत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागात वरिष्ठ स्टेनोग्राफर म्हणून नियुक्ती मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांच्या मित्र परिवारात आनंदाचे वातावरण आहे. नकुल काफरे यांनी कठोर परिश्रम, वेळेचे नियोजन व चिकाटीच्या जोरावर त्यांनी ही स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करत शासकीय सेवेत प्रवेश मिळवला.

## प्राथमिक आरोग्य केंद्र पीर पिंपळगाव येथे सेवा पंधरवड्याअंतर्गत स्वस्थ नारी सशक्त परिवार



**बीड | प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या उपक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र पिरपिंपळगाव या ठिकाणी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये गरोदर महिला स्तनदा महिला बालके वयोवृद्ध महिला यांची आरोग्य विषयक तपासण्या करून याम ध्ये तज्ञ डॉक्टरांकडून शिबिरामध्ये तपासणी व उपचार करण्यात आले यामध्ये हायपर टेन्शन डायबेटीस कॅन्सर नेत्र तपासणी पंतप्रधान आयुष्यमान भारत योजना अंतर्गत जन आरोग्य कार्ड काढणे आभा कार्ड काढणे क्षयरोग तपासणी व समुपदेशन त्यानंतर योगा विषयक माहिती पोषण व आहार विषयक माहिती अशा विविध प्रकारच्या शिबिरामध्ये समावेश करण्यात आला होता या शिबिराचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले यावेळी पंचक्रोशी मधील सामाजिक पदाधिकारी बचत गटाचे कार्यकर्ते व पी एस सी अंतर्गत येणारे सर्व गावाचे सरपंच या कार्यक्रमासाठी उपस्थित होते प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव यांचा सर्व कर्मचारी वृंद आशा सेविका यांचा या कार्यक्रमामध्ये सहभाग होता यामध्ये १३२ म हिलांची आरोग्य तपासणी करून आजचे शिबिर यशस्वी करण्यात आले.

# ‘पायखुटी’ कादंबरीत ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन - डॉ प्रमोद कुमावत

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** ग्रामीण कथा लेखक तथा कादंबरीकार छबुराव भांडवलकर यांच्या लिखाणातून ग्रामीण शेतकरी, कष्टकरी, पीडित समाजाचे यथार्थ दर्शन होते किंबहुना ग्रामीण जनजीवन हाच भांडवलकरांच्या लिखाणाचा केंद्रबिंदू आहे असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. प्रमोद कुमावत यांनी केले.

शहरातील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात बुधवारी (दि. १७) ग्रामीण साहित्यिक छबुराव भांडवलकर लिखित पायखुटी’ कादंबरीचे प्रकाशन डॉ. प्रमोद कुमावत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. भारत खंदारे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर यावेळी निवृत्त प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे, जीवन विद्यार्थी प्रतिष्ठानचे दीपकराव कुलकर्णी, प्रा. डॉ. राम निकम, प्रा.डॉ. रावसाहेब ढवळे, प्रा. डॉ. यशवंत सोनुने,प्रा. बसवराज कोरे, अंकुश मोरे, सुरेश राऊत यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. कुमावत म्हणाले की, छबुराव भांडवलकर यांच्या लिखाणातून ग्रामीण जीवनाचे वास्तववादी दर्शन होते. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, पीडित समाज हा भांडवलकरांच्या लिखाणाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा, सततची नापिकी, वाट्याला येणारा ओला व कोरडा दुष्काळ, ग्रामीण समाजकारण, राजकारण हे व इतर अनेक विषय भांडवलकरांनी आपल्या लिखाणातून लिलया हाताळले आहेत. बालपणापासून ग्रामीण जीवनाशी जोडलेली



त्यांची नाळ निवृत्तीनंतरही कायम आहे हे विशेष. त्यांनी लिहिलेली पायखुटी ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे यथार्थ चित्रण घडविते. एखाद्या कामात अपयश आल्यास माणसाने खचून जाऊ नये. निराश होऊ नये. नकारात्मक विचार मनात आणू नये. सकारात्मक विचार करावा. आत्महत्या हा कुठल्याही वेदनेवरचा उपाय नाही. आत्महत्येने कुठलेही प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीतीत आत्महत्या करू नये हे या कादंबरीतून शिकायका मिळते. सोबतच कादंबरी वाचताना वाचकाला ग्रामीण जनजीवनाचे वास्तववादी दर्शनही होते. कादंबरी उत्साहवर्धक आहे. कादंबरीतील मुख्य नायक रमेशच्या जीवनात आता पुढे काय होईल याची उत्कंठा क्षणाक्षणाला वाढत जाते. एकंदरीत अतिशय मार्मिक असे लिखाण या कादंबरीत दिसते. यावेळी निवृत्त प्राचार्य डॉ. दिरंगे, रावसाहेब ढवळे, तौर, बसवराज कोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक रमेश आढाव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लंका सोनवणे यांनी केले तर प्रा. आशिष गारकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला साहित्य प्रेमी मंडळी, आविष्कार साहित्य मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.